**L. A. BILL No. XXIII OF 2024.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

**सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३.**

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १६ ऑगस्ट २०२४ रोजी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२४ हा प्रख्यापित केला होता ;

१९६५ चा महा. ४०.

२०२४ चा महा. अध्या. ५.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंचाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०२४, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १६ ऑगस्ट २०२४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ३४१ब-१ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ३४१ब-१ मधील पोट-कलम (९) वगळण्यात येईल आणि ते १ जानेवारी २०२२ रोजीपासून वगळण्यात आले असल्याचे मानण्यात येईल.

१९६५ चा महा. ४०.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ३४१ब-२ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३४१ब-२ मध्ये, पोट-कलम (६) मधील "अडीच वर्षांच्या मुदतीसाठी" या मजकुराऐवजी "पाच वर्षांच्या मुदतीसाठी" हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि तो १ जानेवारी २०२२ रोजीपासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ३४१ब-४ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३४१ब-४ मध्ये,—

(एक) पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल आणि ते १ जानेवारी २०२२ रोजीपासून दाखल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :—

"(१) अध्यक्षाचा पदावधी पाच वर्षे इतका असेल आणि त्याची मुदत नगर पंचायतीच्या मुदतीबरोबरच समाप्त होईल.";

(दोन) पोट-कलम (३) वगळण्यात येईल आणि ते १ जानेवारी २०२२ रोजीपासून वगळण्यात आले असल्याचे मानण्यात येईल.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**५.** (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे, परंतु या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे निदेश, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, देता येतील :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला कोणताही आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

२०२४ चा महा. अध्या. ५.

सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ याचे निरसन व व्यावृत्ती.

**६.** (१) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२४, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४० ) यामध्ये अंतर्भूत असलेल्या नगर पंचायतीच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाच्या निवडणुकीसंबंधीच्या तरतुदींमध्ये, निवडून आलेल्या पंचायत सदस्यांद्वारे त्यांच्यामधून नगर पंचायतीच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड करण्यासाठी आणि अशा पदाधिका-यांचा पदावधी अडीच वर्षे इतका करण्यासाठी तरतूद करण्याच्या दृष्टीने, सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याद्वारे सुधारणा करण्यात आलेली आहे. सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या प्रारंभानंतर नगर पंचायतींसाठी घ्यावयाच्या निवडणुकांच्या बाबतीत, अध्यक्षाची थेट निवडणूक करण्यासाठी आणि अध्यक्षाचा व उपाध्यक्षाचा पदावधी पाच वर्षे इतका करण्याच्या दृष्टीने उक्त अधिनियमात सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ द्वारे त्यानंतर सुधारणा करण्यात आली आहे.

२. अप्रत्यक्षपणे निवडलेल्या नगर पंचायतींच्या अध्यक्षाचा व उपाध्यक्षाचा पदावधीदेखील पाच वर्षे इतका असेल अशी तरतूद करणे आवश्यक आहे असे शासनास वाटले. म्हणून, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम ३४१ब-१, ३४१ब-२ व ३४१ब-४ यामध्ये सुयोग्य सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले होते.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १६ ऑगस्ट २०२४ रोजी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२४ (२०२४ चा महा. अध्या. ५), हा प्रख्यापित केला होता.

४. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

नागपूर,
दिनांक १५ डिसेंबर, २०२४.

**देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहे :—

**खंड ५ (१).** या खंडान्वये, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना, कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, ती दूर करण्यासाठी **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेला आदेश काढण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा वर नमूद केलेला प्रस्ताव, हा सामान्य स्वरूपाचा आहे.

**सन २०२४ चे वि. स. विधेयक क्रमांक २३ – महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२४ याचे परिशिष्ट**

**(महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यातील उतारे)**

**(सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक — ४०)**

**१ ते ३४१ ब.** XX XX XX

**३४१ ब-१. (१) व (८)** XX XX XX

नगर पंचायतीच्या अध्यक्षाची निवडणूक.

(९) पोट-कलम (२) च्या तरतुदीन्वये निवडून दिलेल्या अध्यक्षाचा अडीच वर्षांचा पहिला पदावधी समाप्त झाल्यानंतर अध्यक्षाच्या पदाची नंतरची निवडूणक, आधीच्या अध्यक्षाचा उक्त पदावधी समाप्त होण्याअगोदरच्या आठ दिवसांच्या कालावधीच्या आत घेण्यात येईल :

परंतु, नव्याने निवडून आलेला अध्यक्ष मावळत्या अध्यक्षाचा पदावधी समाप्त होण्याच्या अखेरच्या दिवशी किंवा नंतरच्या दिवशी, कार्यभार स्वीकारील.

**३४१-ब-१अ.** XX XX XX

**३४१ ब-२. (१)** ते **(५).** XX XX XX

नगर पंचायतीच्या उपाध्यक्षाची निवडणूक.

(६) कलम ५५ अ च्या तरतुदींना व या अधिनियमाच्या इतर तरतुदींना अधीन राहून, उपाध्यक्ष तो निवडून आल्याच्या दिनांकापासून अडीच वर्षांच्या मुदतीसाठी पद धारण करील.

**(६ अ)** ते **(७)** XX XX XX

**३४१ ब-३.** XX XX XX

नगर पंचायतीच्या अध्यक्षाच्या पदाची मुदत.

**३४१ ब-४.** (१) नगरपंचायतीच्या अध्यक्षाच्या पदाची मुदत ही अडीच वर्षांची असेल.

(२) XX XX XX

(३) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०२२ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी ज्या नगरपंचायतींच्या बाबतीत सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या असतील अशा नगरपंचायतींच्या संबंधात जे अध्यक्ष पद धारण करीत असतील अशा अध्यक्षांच्या पदाच्या मुदतीस पोट-कलम (२) मधील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही आणि या कलमाच्या तरतुदी ह्या अशा प्रारंभाच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या दिनांकास अस्तित्वात असल्याप्रमाणे अशा अध्यक्षाच्या पदाच्या मुदतीच्या संबंधात लागू असल्याचे चालू राहील.”.

**३४१ ब-५** ते **३४१ ब-७** XX XX XX

**३४१ क** ते **३४१ स.** XX XX XX

**३४२.** ते **३५१.** XX XX XX

**अनुसूची.** XX XX XX

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३.]**

**[महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**(श्री. देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.)

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मुद्रणालय, नागपूर